# <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.८१/१९८३</u>

## <u>निशाणी ३१७ खालील आदेश</u>

**<u>CNR.No.MHSI06-000006-1983</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१३ब ते १३फ तर्फे भारतीय पुरावा कायदा कलम ९० अन्वये दाखल करणेत आलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांच्या मते प्रस्तुतकामी निशाणी १६५/१ लगत प्रस्तुत प्रतिवादी यांनी कै.बाबाजी सखाराम पेडणेकर यांस कै.केशव शिवराम मुळीक वगैरे ३ यांनी लिहून दिलेला दि.२१/०३/१९४२ रोजीचे मोडीलिपीतील गहाणखत हजर केलेले आहे व त्यासोबत विठ्ठल आत्माराम केसकर यांनी त्याचे केलेले मराठीत भाषांतर हजर केलेले असून त्यावर त्यांची सही आहे. विठ्ठल आत्माराम केसकर हे मयत आहेत. दि.२१/०३/१९४२ रोजीचे मोडी लिपीतील गहाणखत हा ८१ वर्षापुर्वीचा कागदोपत्री पुरावा असलेमुळे भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणेचे गृहितक लागू होणार आहे. सदरचा गहाणखताचा दस्त बाबाजी सखाराम पेडणेकर यांनी प्रतिवादी नं.१३ चे वडील कै. रामा रेडकर यांचे ताब्यात दिलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी रामचंद्र रेडकर यांनी हजर होवून सदरचा दस्त हजर केलेला आहे तसेच त्याचे मराठी भाषांतर देखील हजर केलेले आहे. सदर दस्तास निशाणी देणेस वादीतर्फे हरकत घेणेत आलेमुळे त्यास निशाणी देणेत आलेली नाही. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांनी निशाणी १६५/१ लगत दाखल केलेल्या दि. २१/०३/१९४२ रोजीच्या गहाणखतास निशाणी देणेबाबत व पुराव्याचेकामी वाचन करणेबाबत विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि.३२२ लगत म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी प्रदीर्घ विलंबाने दाखल केलेला आहे असे कथन करुन अर्ज नांमजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी नं. १३ब ते १३फ तर्फे विधिज्ञ तसेच वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहता दि.१६/१२/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१३ब ते १३फ तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास नोंदविणेत आलेला आहे. सदर सरतपास नोंदवितेवेळेस प्रस्तुत प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी निशाणी १६५/१ लगत दाखल केलेला मुळ गहाणपट्टा व त्यासोबत हजर केलेली भाषांतरीत प्रत साक्षीदारास दाखविलेली होती. तथापि मुळ गहाणपट्टा हा मोडी भाषेत नमूद आहे. सबब, त्यामध्ये नेमका काय मजकूर नमूद आहे हे स्पष्ट झालेले नसलेमुळे या न्यायालयाने भारतीय पुरावा कायदा कलम ९० नुसार सदर दस्तास निशाणी अथवा आर्टिकल देणेबाबतची प्रस्तुत प्रतिवादी यांची विनंती सरतपास नोंदवितेवेळेस सदर कारणमिमांसा नोंद करुन नाकारलेली आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ९० मध्ये नमूद असणारी तरतुदीनुसार ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या कागदोपत्री पुराव्याबाबत गृहितक लागू होवू शकते. तथापि, न्यायालयासमक्ष सादर केलेले गहाणखत हे मोडी भाषेतील असलेमुळे ते नेमके कोणत्या वर्षातील आहे ही बाब सिद्ध झालेली नाही. अशा परिस्थितीत सदरचे गहाणखत हे ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीचे जुने कागदपत्र आहे अगर कसे हे सिद्ध न झालेमुळे भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणेच्या तरतुदीचा फायदा प्रतिवादीस न देता सरतपासादरम्यान त्यांची विनंती नाकारलेली होती. तदनंतर सदर निशाणी १६५/१ लगत हजर केलेल्या गहाणखता अनुषंगे अन्य कोणताही साक्षीदार तपासणेत आलेला नसून सदर कागदपत्रके ही भारतीय पुरावा कायदा मधील तरतुदीनुसार अद्याप सिद्ध झालेली नाहीत. तसेच परिस्थितीमध्ये कोणताही बदल झालेला नाही. प्रतिवादी हे सदर अर्जाद्वारे जी विनंती या न्यायालयाने यापूर्वी नाकारलेली आहे, तीच विनंती याच न्यायालयासमक्ष पुन्हा करीत आहेत. सदरचा अर्ज पुर्नविचार (Review) व्हावा म्हणून दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये या न्यायालयास पुर्वी केलेल्या आदेशामध्ये पुन्हा बदल करणेचा अधिकार नाही. वादीतर्फे हजर करणेत आलेले न्यायनिर्णय

म्हणजे *1]* ***Bama Kothari Patil Vs. Rohidas Arjun Madhavi & Anr. 2004(2) ALL MR 290*** *2]* ***Bharat R.Desai & Anr. Vs. Naina Mohanlal Bhal 2004(2) ALL MR 291*** *3]* ***Dr. Manish Pralhad Bhosale Vs. State of Maharashtra & Ors. 2004(2) ALL MR*** 295 या न्यायनिर्णयातील प्रमाण सद्य परिस्थितीत या प्रकरणांस लागू होणारे नाही. सबब न्यायाचे कारणास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–::आदेश::–**

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

( दुर्गा प्र.पुजारी )

दिनांकः–३१/०१/२०२४.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),सावंतवाडी